
माझं नाव आहे

गॅबिटो



लेखिका: मोनिका ब्राऊन

चित्रे: राउल कोलन

गॅब्रियेल गार्सिआ मार्केझ यांची कहाणी

तुम्ही जादुच्या गालिचावर बसून हवेत उडायची कल्पना करू शकता का?

गॅबिटो नावाच्या लहान मुलाने एकदा अशी कल्पना केली होती.

गॅब्रियेल गार्सिया मार्केझ हे आमच्या काळातील एक बुद्धिमान लेखक होते. ते आपल्या शब्दांनी विविध कल्पनांचं जग उभं करतात. रोजच्या आयुष्यात आढळणाऱ्या विविध जादूई चमत्कारांचा विचार करायला ते वाचकांना स्फूर्ती देतात. ते एक विलक्षण व्यक्तिमत्व आहेत, अत्यंत कुशल शब्दप्रभू आहेत आणि लोक त्यांची अपार स्तुती करतात. या व्यक्तिची ही कहाणी मुलांना नक्कीच आवडेल. मार्केझ यांच्या कादंबऱ्यांतील प्रतिमा वापरून पुरस्कारप्राप्त लेखिका मोनिका ब्राऊन यांनी या लेखकाचे कोलंबियातील बालपण ते आजपर्यंतचं आयुष्य हा काळ या पुस्तकात उभा केला आहे. कल्पना आणि सौंदर्य यांनी भरपूर नटलेली एका प्रेरणादायी आयुष्याची ही कहाणी आहे.





माझं नाव आहे *गॅबिटो*

गॅब्रियेल गार्सिआ मार्केझ

यांची कहाणी

मराठी अनुवाद: सुशील मेन्सन




एका दुर्घटनेत उध्वस्त झालेल्या जहाजाचा खलाशी आठ दिवस हवा आणि सागरी शैवाल खाऊन जिवंत राहिला, अशी कल्पना तुम्ही करू शकता का?


पिवळी फुलपाखरं प्रेमगीतावर आपले पंख फडफडवतायत, अशी कल्पना तुम्ही करू शकता का?

सोन्या-चांदीचे मासे हवेत तरंगतायत, अशी कल्पना तुम्ही करू शकता का?





तुम्ही कल्पना करू शकता का?



गॅबिटो नावाचा एक लहान मुलगा होता. तो अशा प्रकारच्या कल्पना करू शकत होता. पुढे जाऊन हा मुलगा जगातील एक महान लेखक बनला.

गॅबिटोचा जन्म कोलंबिया देशातील *अराकाटाका* नावाच्या जादुई शहरात झाला. त्याच्या कल्पना कोलंबियाची घनदाट जंगलं आणि उंच पर्वत यांच्यासारख्याच मोठ्या आणि रांगड्या असत.


गॅबिटोसाठी हे जग जादुई होतं. तो आपल्या मोठ्या कुटुंबात एका लहानशा घरात वाढला. त्याच्या आजीनुसार, गॅबिटोने लहानपणी एका विचित्र, गूढ भुताची कल्पना केली होती. लहानगा गॅबिटो कल्पना करत असे की एका स्त्रीचं भूत तरंगत त्याच्या घरात आलं आणि ते घरातली रिकामी आरामखुर्ची हलवत बसलं.

पुढे-मागे, पुढे-मागे!

गॅबिटो कधीही त्या आरामखुर्चीत बसला नाही कारण त्याला त्या भुताला चिरडायचं नव्हतं.

गॅबिटोची कल्पनाशक्ती अफाटच होती.





गॅबिटो एका 100 वर्षांच्या वृद्ध बोलक्या पोपटासोबत – *लॉरेंझो*सोबत – राहात असे. काहीवेळा त्याच्या या पोपटाची बडबड खरी ठरत असे.

एकदा गॅबिटोने लॉरेंझोची नवी गोष्ट ऐकली. एका महाकाय तापट बैलाने त्याला बांधलेला दोरखंड सैल केला. मग तो रागीट बैल त्यांच्या स्वयंपाकघरातून धावला! गॅबिटोला वाटलं की लॉरेंझोकडे कदाचित एखादी चमत्कारी शक्ती असावी.

गॅबिटोची कल्पना रांगडी होती.





गॅबिटोची सर्वात आवडती व्यक्ती होती, त्याचे आजोबा *निकोलस.* त्यांच्याकडे असंख्य विस्मयकारक शब्दांचा एक विशाल शब्दकोश होता. या शब्दकोशातून गॅबिटो शिकला की जादू केवळ चेटकिणींनाच अवगत नसते, जिप्सी लोक हे भटके आणि धाडसी वृत्तीचे असतात आणि शब्द मोठमोठे, विशाल व रांगडे असू शकतात.

गॅबिटो जितके जास्त शब्द शिकला तितक्याच जास्त गोष्टी त्याने सांगितल्या.



दररोज न्याहारीनंतर, गॅबिटो आणि आजोबा एकसारख्याच दिसणाऱ्या टोप्या डोक्यावर घालत. मग ते एकमेकांचे हात पकडून, चमेलीच्या फुलांचा सुगंध हुंगत अराकाटाका शहरात फेरफटका मारत. दोघं मोठ्या खुशीत एका कॅफेत जात. तिथे आजोबांचे मित्र दुपारच्या जेवणासाठी त्यांची वाट बघत बसलेले असत. आजोबा नेहमी गॅबिटला थंड पाण्याच्या जगमध्ये हात बुडवू देत आणि त्यातील बर्फाचे तुकडे बाहेर काढू देत.


गॅबिटो जितक्या जास्त लोकांना भेटला, तितक्याच जास्त गोष्टी त्याने सांगितल्या.





कधीकधी गॅबिटो आणि आजोबा शहराच्या सीमेवर असलेल्या मोठ्या केळ्याच्या बागेकडे फिरकत. बागेतील मजूर खूप मेहनत करून केळी तोडतात, हे दृश्य त्यांना दिसत असे. एवढं कष्ट उपसणारे हे मजूर गरीब आहेत, हे बघून लहानग्या गॅबिटोला वाईट वाटे. गॅबिटोने एका अशा जगाची कल्पना करायचा प्रयत्न केला जिथे कुणीही गरीब नव्हतं आणि जिथे प्रत्येकजण आपल्या आजोबांसोबत, एकमेकांचे हात धरून, बर्फाचे तुकडे करत झाडाच्या सावलीत बसू शकत होते.

गॅबिटोने जितक्या जास्त गोष्टी पाहिल्या, तितक्याच जास्त गोष्टी सांगितल्या.






गॅबिटो वयाने वाढला, त्याची उंची वाढली. तो शिकला की भुतं खरोखर असतात, पोपट कधीकधी खरं बोलतात आणि या चमत्कारी जगात सगळंच काही छानछान नसतं. आपल्याला गोष्टी-कथा-कहाण्या खूप आवडतात ही अत्यंत महत्त्वाची गोष्ट त्याला उमगली. त्याला गोष्टी ऐकायला, वाचायला, सांगायला आणि लिहायला आवडू लागलं. त्याला अशा जगाची कल्पना करायला आवडू लागलं जिथे अशक्य गोष्टी शक्य आहेत, जिथे लोक हवेत तरंगू शकतील, उडू शकतील.

तो जितक्या जास्त गोष्टी लिहू लागला, तितकंच जास्त लिहायची इच्छा त्याला होऊ लागली.







गॅबिटो मोठा झाला तेव्हा त्याने जगातील सर्वात रोमांचक गोष्टी लिहिल्या. त्याच्या गोष्टींत चमत्कार असे, नवलाई असे पण त्या तुमच्यामाझ्यासारख्याच अस्सल असत.

गॅबिटोने कोणत्या प्रकारच्या गोष्टी सांगितल्या, याची कल्पना करू शकता का तुम्ही?

डोळे बंद करा आणि बघा.







तुम्ही कल्पना करू शकता?

विशाल पंख असलेला एक माणूस
आभाळातून खाली पडतोय, अशी कल्पना
करू शकता का तुम्ही?

तुम्ही जगातल्या सर्वात सुंदर स्त्रीची कल्पना करू शकता का?


कल्पना करून बघा जरा.





तुम्ही कल्पना करू शकता?

जादुच्या गालिचावर बसून हवेत उडायची कल्पना तुम्ही करू शकता का?






या गोष्टी जादुई वाटतात कारण त्या तशाच आहेत. गॅबिटो नावाच्या मुलाने त्या लिहिल्या आहेत. मोठं झाल्यावर तो *गॅब्रियेल गार्सिया मार्केझ* नावाचा महान लेखक बनला. लाखो लोकांनी त्याच्या गोष्टी वाचल्या आणि सर्वांनाच त्या आवडल्या. पण गॅबिटो पोपटाला, बैलाला, चमेलीच्या फुलांना, केळ्याच्या बागेतील मजुरांना आणि असंख्य चमत्कारीक शब्द असलेल्या शब्दकोशाला कधीच विसरला नाही.

सात खंडांतील लोकांनी त्याच्या गोष्टी वाचल्या. त्यांना त्या आवडल्या. यातून गोष्टी किती जादुई, रांगड्या आणि मोठ्या असू शकतात, हे लोकांना उमगलं.





गॅब्रियेल गार्सिया मार्केझ

गॅब्रियेल गार्सिया मार्केझकडे एक मोठं कौशल्य होतं.

तो एक लेखक होता. 6 मार्च 1928 रोजी, जन्मलेल्या गॅब्रियेलचं टोपणनाव गॅबिटो होतं. तो कोलंबियाच्या उत्तरेस असलेल्या अराकाटाका शहरात जन्मला. गॅबिटोचं संगोपन त्याच्या आजी-आजोबांनी केलं. त्याच्या घरात भाऊ, बहिणी आणि 100 वर्षे वयाचा बोलका पोपट, लोरेंझो हे सदस्य होते. गॅबिटो आपल्या आजी-आजोबांकडून खूप काही शिकला. ते त्याला छानछान गोष्टी सांगत असत.

नंतर गॅबिटोने एक पत्रकार आणि एक कादंबरीकार म्हणूनही काम केलं. त्यांनी युरोप, अमेरिका आणि मेक्सिकोतही वास्तव्य केलं. 1958 साली, त्याने आपली लहानपणीची मैत्रीण *मर्सिडीझ बार्चा पार्डो* हिच्याशी लग्न केलं. त्यांना दोन मुलं झाली, रॉड्रिगो आणि गोंझालो.

गॅबिटो सुरुवातीला केळ्याच्या बागेतील गरीब मजुरांच्या परिस्थितीने प्रभावित झाला. मजुरांच्या संघर्षाप्रती त्याला आदर होता. जगातील महान लेखकांच्या पंक्तीत जाऊन बसल्यावरही गॅबिटो मजुरांना विसरले नाहीत. मजुरांच्या दु:खद कहाण्या त्यांनी आपल्या कथा-कादंबरीतून पुढे आणल्या.

गॅब्रियेल गार्सिया मार्केझने *लव्ह इन द टाइम ऑफ कॉलरा (1988), लिव्हिंग टू टेल द ट्रुथ (2003)* आणि त्याची सर्वोत्कृष्ट कादंबरी *वन हंड्रेड यर्स ऑफ सॉलिट्यूड (1967)* अशी तीसपेक्षाही जास्त पुस्तकं लिहिली. 1982 साली त्यांना साहित्याचं नोबेल पारितोषिक प्रदन करण्यात आलं. त्यांच्या गोष्टी जगभर आवडीने वाचल्या जातात. त्यांनी कोलंबिया, तेथील लोक आणि ठिकाणं यांच्याबद्दल जादुई तसेच अस्सल अशा बऱ्याच गोष्टी लिहिल्या. शेवटी ते मेक्सिको सिटी शहरात राहिले. 17 एप्रिल 2014 रोजी त्यांचं निधन झालं.

समाप्त